MHKO050029052024

**नियमित फौजदारी खटला क्र.२२६/२०२४.**
**सरकार विरूध्द अनिता सतिश फडतारे.**

**जामीन अर्जावर आदेश.**

वर्दीदाराने दाखल केलेली वर्दी लेखनिर्विष्ट करून आरोपी विरूध्द भा.दं. वि.कलम ४०६ व ४०९ नुसार गुन्ह्याची नोंद. आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये.

**(२)** आरोपीच्या विव्दान विधिज्ञांचा युक्तीवाद की :

**(i)** आता दोषारोपपत्र दाखल. काहीही जप्त नाही.

**(ii)** प्रथम अहवाल दाखल करण्यास उशीर.

**(iii)** गुन्हेगारी पार्श्वभुमी नाही.

**(iv)** संबंधित सराफ बॅकेच्या कॅशिअरकडे तारण सोने हे जमा करतात, व्यवस्थापकाकडे नाही.

**(v)** क्षणभर गृहित धरले की, काही सोने गहाळ झाले, याचा अर्थ आरोपीने ते चोरले किंवा अपहार केला असे होणार नाही.

**(vi)** दि.०१/११/२०२३ रोजी आरोपीने व्यवस्थापक पदाचा पदभार स्विकारला. लेखापरिक्षण हे माहे फेब्रुवारी २०२४ मध्ये झाले.

**(vii)** कॅशिअरचा जबाब नोंदविलेला नाही.

**(viii)** आरोपी ही महिला आहे. बराच कालावधीपासून बंदी कैदी. आता तपास पुर्ण झाला आहे. संपरिक्षा पुर्ण होईपर्यंत आरोपीस बंदी कैदी ठेवणे खरा न्याय होणार नाही. हे न्यायालय घालुन देईल त्या सर्व अटि व शर्तीचे पालन करण्यास आरोपी तयार आहेत.

विद्वान अभियोक्ता यांनी जामीन अर्ज मंजुर करण्यास हरकत नोंदविली. त्यांचे मुख्य कथन की अपराध अजामिनपात्र तसेच गुन्हयाचे स्वरूप गंभीर.

**(३)** आरोपी ह्या आप्पासाहेब नाईक दादा श्री पैसा फंड शेतकी सहकारी बॅक मर्यादित, शाखा रांगोळी येथे व्यवस्थापक म्हणून कार्यरत याबाबत कोणताही वाद नाही. सोन्याचे जिन्नस बॅकेमध्ये जमा करीत सभासदांनी सोनेतारण कर्ज घेतले ही बाब देखील वादातीत नाही. सोन्याचे सदर जिन्नस सभासदाने बॅकेमध्ये जमाच केली नाही असे बचावपक्षाचे कथन नाही. सदर जमा केलेली जिन्नस मिळून येत नाहीत ही बाब देखील वादातीत नाही.

**(४) जामीन अर्ज नामंजुर. त्याची कारणे खालीलप्रमाणे** :—

**(i)** कोणतीही व्यक्ती एखादे पद धारण करून खुर्चीमध्ये बसते त्यावेळी एक जबाबदारी घेउन ती व्यक्ती कर्तव्य बजावीत असते. ‘‘व्यवस्थापक’’ या हुद्यामध्येच सर्व बाब दडलेली आहे. क्षणभर गृहित धरू की, कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी बॅकेचा आदर्श व्यवस्थापक म्हणून

समजा आरोपी यांची निवड झाली असती तर त्या मागे व्यवस्थापक म्हणून त्यांनी काटेकोरपणे निभावलेले त्यांचे कर्तव्य पुरेसे नाही तर त्यांच्या सर्व सहका—यांचे योगदान हे देखील महत्वाचे. त्यामुळे संपुर्ण शाखेच्या सहकार्यामुळे व्यवस्थापक हे कौतुकास पात्र ठरतात. तोच धागा पकडत या न्यायालयास वाटते की, इतर सर्व सेवक, कर्मचारी, अधिकारी यांच्या निष्ठापुर्वक सहकार्यामुळे शाखेला गौरव मिळाला तर त्या सर्वांच्या वतीने व्यवस्थापक हे तो गौरव कौतुकाने स्विकारतात त्याचप्रमाणे अॅडवर्स परिस्थितीमध्ये शाखेबाबत जर काही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले तर व्यवस्थापक म्हणून ती व्यक्ती अॅन्सरेबल आहे.

**(ii)** सोन्याचे सदर जिन्नस माझ्याकडे नाही तर कॅशिअरकडे जमा केली जाते असे म्हणत आरोपी व्यवस्थापक आपली जबाबदारी झटकू शकत नाही.

**(iii)** प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गहाळ झालेले सोन्याचे जिन्नस जमा करण्याबाबत स्वत: आरोपी व्यवस्थापक यांनीच बांधून घेतलेले आहे.

**(iv)** सोन्याचे जिन्नस तारण ठेवून मोठ्या रक्कमेचे कर्ज दिलेले आहे. त्यामुळे ती जिन्नस मिळून येत नसेल तर तिचा अप्रामाणिकपणे अपहारच केला आहे असे समजण्यास वाव आहे आणि व्यवस्थापक या नात्याने त्याबाबत सुस्पष्ट स्पष्टीकरण देणे ही आरोपीची जबाबदारी. इतर कर्मचा—यांना जबाबदार धरत त्या त्यांची जबाबदारी टाळू शकणार नाहीत.

**(v)** असे स्पष्ट दिसून येते की, अढळ होत नसलेल्या सदर सोन्याच्या जिन्नसवर व्यवस्थापक या नात्याने आरोपी यांची थेट हुकूमत होती. ती मौल्यवान वस्तू विश्वासाने त्यांच्याकडे सोपविलेली असताना ती सोन्याची जिन्नस मिळून येत नसेल तर सदर मालमत्तेचा आरोपी यांनीच अपहार केला किंवा ती वस्तू आपल्या उपयोगाकरिता स्वत:ची म्हणून वापरली आणि वैध संविदेचा त्यांनी भंग केला असे समजण्यास वाव आहे.

**(vi)** सदर सोन्याची जिन्नस मिळून आलेली नाही ज्यामुळे त्या मालमत्तेचा आरोपी यांनी स्वत:साठी वापर केला किंवा तिची वासलात लावली ज्याद्वारे फौजदारीपात्र न्यासभंग केला ही बाब प्रथमदर्शनी दिसून येते.

**(vii)** फौजदारीपात्र न्यासभंगामध्ये एखाद्या मालमत्तेचा एखाद्या व्यक्तीने स्वत: अपहार करणे किंवा स्वत:ची म्हणून त्या वस्तुचा वापर करणे ही बाब तर महत्वाची आहेच परंतु, त्याच जोडीने ज्याच्याकडे विश्वासाने मालमत्ता सोपविली असेल, मालमत्तेवर ज्या व्यक्तीची हुकुमत असेल जर त्या मालमत्तेची वासलात लावण्याकरिता बुध्दी पुरस्सरपणे त्या व्यक्तीने इतर कोणत्याही व्यक्तीला तसे करू देत असेल तर ती बाब देखील फौजदारीपात्र न्यासभंग ठरते. त्यामुळे क्षणभर गृहित धरले की, बॅकेमधील अधिकारी / कर्मचारी यांच्यापैकी कोणीही त्या मालमत्तेची वासलात लावली तरी देखील त्या शाखेचे प्रमुख म्हणजे व्यवस्थापक या नात्याने त्या बाबींकरिता आरोपी हे अॅन्सरेबल आहेत.

**(viii)** आरोपी हे बॅक व्यवस्थापक असल्यामुळे व त्यांची हुकुमत असलेल्या मालमत्तेचा अपहार / फौजदारीपात्र न्यासभंग झाल्यामुळे या प्रकरणामध्ये भा.दं.वि.कलम ४०९ हे लागू पडते की, ज्याकरिता आजीव कारावासाची शिक्षा असल्यामुळे देखील, फौप्रसं कलम ४३७ मधील बंधने लक्षात घेता आरोपी हे जामीन मिळण्यास अपात्र ठरतात.

**(ix)** अशा प्रकरणाकडे गांभीर्याने पहाने जरूरी. तात्काळ जामीनावर मुक्तता केल्यास त्याव्दारे अश्या प्रकारचे अपराध करणा—या आरोपींचे मनोधर्य वाढू शकते परत अश्याच प्रकारचे गुन्हे करण्यास ते धजावू शकातात तसेच त्याव्दारे समाजामध्ये देखील चुकीचा संदेश जाईल.

**(x)** अन्वेषनांति प्रथमदर्शनी आरोपीचा गुन्हामधील सहभाग दिसून येतो.

**(xi)** दखलपात्र व आमीनपात्र अपराध आहे.

**(xii)** एखाद्या अपराधाच्या गुन्हयाकरीता जामीनावर मुक्त करण्याचे न्यायदंडाधिका—याचे अधिकार आणि प्रकरणाचा गुणदोषावर निर्णय करून जामीन मंजुर करण्यासारखी स्थिती आहे किंवा नाही ही बाब ठरविणे या दोन भिन्न बाबी आहेत. केवळ न्यायदंडाधिका—याला अधिकार आहे म्हणजे त्याने प्रत्येक गुन्हयामध्ये तसा अधिकार वापरून जामीन दयायलाच हवा असे नाही.

**(xiii)** फौ.प्र.सं.कलम ४३७ मध्ये बिनजामीनी अपराध्याच्या बाबतीत जामीन केव्हा घेता येईल याबाबत सविस्तरपणे नमुद. जेव्हा कोणताही बिनजामिनी अपराध केल्याचा आरोप असलेल्या किंवा तसा वहीम असलेल्या कोणत्याही व्यक्तीला पोलीस ठाण्याच्या अंमलदारा अधिका—याने वॉरंटाशिवाय अटक केली असेल किंवा स्थानबध्द केले असेल त्या व्यक्तीला जामीनावर मुक्त करण्यात येईल **<u>तथापि</u>**, एक अशी व्यक्ती मृत्युच्या किंवा जन्मठेपेच्या शिक्षेस पात्र अश्या अपराधाबद्यल दोषी आहे असे समजण्यास वाजवी कारण दिसत असल्यास तिला याप्रमाणे सोडले जाणार नाही.

**(xiv)** विश्वासाने सोपविलेल्या लाखो रूपये किंमतीच्या मालमत्तेचा अपहार, फौजदारीपात्र न्यासभंग असा थेट आरोप आहे. ती मालमत्ता परत करण्याचे आरोपीने आश्वासित देखील केलेले असताना देखील अद्याप काहीही जप्त नाही आणि मुख्य बाब म्हणजे फौजदारीपात्र न्यासभंगा सारख्या अपराधामध्ये ज्या रक्कमेचा न्यासभंग केला आहे समजा त्याने ती रक्कम जमा केली/संबंधितास परत केली तरी देखील गुणदोषावर कोणताही परिणाम ठरत नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात आरोपी ह्या जामिन मिळण्यास अपात्र.

**(xv)** आरोपी ह्या महिला, त्यांच्यावर त्यांचे कुटूंबीय अवलंबुन आहेत केवळ या कारणावरुन जामीन मंजुर करता येणार नाही.

**(xvi)** दोषारोप दाखल झाले म्हणजे जामिन मंजुरच करावा असा नियम नाही. उलटपक्षी अन्वेषणांति तपासणी अधिकारी यांना आरोपी विरूध्द

सबळ पुरावा मिळून आल्यामुळेच, संपरिक्षा होणे जरूरी वाटत असल्यामुळे दोषारोप पत्र पाठविले आहे.

**(xvii)** आरोपीच्या सदर कृतीमुळे त्यांच्याच बॅकेच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. जेथे आपण महत्वाच्या पदावर काम करतो त्याच आस्थापनेची आपल्या कृतीमुळे विश्वासार्हता धोक्यात येईल ही बाब देखील गंभीर. करीता आदेश :—

**<u>आदेश.</u>**

जामीन अर्ज नामंजुर केला.

Digitally signed by GHULE GANESH AMBADAS
Date: 2024.07.15 17:49:39 +0530

(गणेश अं.घुले)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, इचलकरंजी
न्यायालय क्रमांक २.
जे.ओ.कोड : २५९४.

दिनांक : १५/०७/२०२४.